आरती नंगेस्वामीची २

।। आरती श्री नंगे स्वामीची ।।

जयदेव जयदेव जय नंगेराया । उल्हेगावी तप झाले प्रकाशली काया ।।धृ।।

ओवाळू आरती नंगे स्वामी देवाला । भाव भक्ति सद्‌बुद्धी द्यावी भक्ताला ॥
सगुण निर्गुण राया परब्रह्म कळा । दिव्य दृष्टी तुझी जना दिसे आंधळा ॥ जयदेव. ।।धृ।।१।।

देही विदेही बोले रूपा वेगळा । आत्मज्ञान देहातीत ईश्वर सावळा ॥
विश्व-जीवन ग्रंथ मूळ रचियेला पाया । कर्मयोग कथिले युगासी माया ॥ जयदेव. ।।धृ।।२।।

परब्रह्म खेळ तुझा वायुसुतासी । परमहंसराया चिरंजीव अससी ॥
दत्त दत्त नाम सदा उच्चार अंतरी । नाथ मच्छिंद्र नंगा वस्ती परावरी ॥ जयदेव. ।।धृ।।३।।

निःसंग संग तूं योगिया माउली । उल्हेगावी तप झाले चिंचेच्या खाली ॥
ज्ञानमुद्रा भक्ति वैराग्य प्रसवली अंगी । नाथांचा तूं नाथ मच्छिंद्र योगी ॥ जयदेव. ।।धृ।।४।।

भक्तांसाठी अवतार घेऊनि आला । आत्मज्ञान दृष्टी देसी भक्ताला ॥
विश्वनाथ करी विनंती गुरुनाथासी । सकळा न्यावे उद्धरून निज धामासी ॥ जयदेव. ।।धृ।।५।।

।। श्री सद्‌गुरूनाथ नंगे महाराज की जय ।